सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# शासकीय तंत्रनिकेतन पुणे

(महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था)
विद्यापीठ मार्ग, शिवाजीनगर, पुणे -४११०१६

दुरध्वनी : (०२०)५६५५९०७
ईमेल : principal.gppune@dtemaharashtra.gov.in
संकेतस्थळ : www.gppune.ac.in

जा.क्र. शातंनिपु/विवि/सूचना/२०२३/ ४६१८

दिनांक: 23 OCT 2023

23 OCT 2023

सूचना

**विषय:-** अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद नवी दिल्ली यांच्या **स्वनाथ** शिष्यवृत्ती योजनेच्या सन २०२३-२०२४ साठीच्या अंमलबजावणीसाठी..........

शैक्षणिक वर्ष २०२३-२०२४ मधील प्रथम वर्षात प्रवेश घेतलेल्या प्रवेशित विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, जे विद्यार्थी अनाथ आहेत किंवा ज्या विद्यार्थ्यांचे आई-वडील दोघेही किंवा दोघांपैकी एक कोविड-१९ मध्ये मृत्युमुखी पडले आहेत किंवा ज्या विद्यार्थ्यांचे पालक सशस्त्र दल आणि केंद्रीय निमलष्करी दलांच्या कारवाईमध्ये शहीद झाले आहेत, अशा विद्यार्थ्यांसाठी अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद नवी दिल्ली यांच्यामार्फत **स्वनाथ** शिष्यवृत्ती योजना राबवली जात आहे. सदर योजना केंद्र शासनाच्या **National Scholarship Portal** (NSP) पोर्टलद्वारे www.scholarship.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईनरित्या राबविण्यात आलेली आहे. तरी विद्यार्थ्यांनी अर्ज १५/१२/२०२३ पर्यंत ऑनलाईन भरावेत तसेच अधिक माहिती व अर्ज भरण्याच्या दिनांकामध्ये बदल यासाठी वरील संकेतस्थळावर अद्ययावत माहिती पाहणे आवश्यक आहे. तसेच सन २०२१-२०२२ व २०२२-२०२३ मधील शिष्यवृत्ती मंजूर झालेल्या पात्र विद्यार्थ्यांनी नुतनीकरण अर्ज (Renewal) अंतिम मुदतीच्या आत ऑनलाईन भरावेत.

एका शैक्षणिक वर्षात केंद्र शासनाच्या **NPS** पोर्टल व महाराष्ट्र शासनाच्या DBT पोर्टलवरील योजनांपैकी कोणत्याही एकाच योजनेचा लाभ घेता येईल.

**स्वनाथ शिष्यवृत्ती** मिळण्यासाठीचे **निकष**

विद्यार्थ्यांचे पालकांचे कूटूंबाचे वार्षिक उत्पन्न् दोन्ही पालकांचे एकत्रित रु. ८.०० लाखापर्यंत असावे.

वरील योजनेच्या माहितीसाठी दि.२५/१०/२०२३ रोजी सकाळी ११ वाजता विश्वेश्वरैया हॉलमध्ये कार्यशाळा आयोजित करण्यात आलेली आहे.

23/10/2023

प्रबंधक
शासकीय तंत्रनिकेतन पुणे

प्रत - १.सर्व विभाग प्रमुख,यांना कळविण्यात येते त्यांनी सदरील सूचना विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून दयावी व आपल्या विभागाच्या सुचना फलकावर लावण्यात यावी.
२. विभाग प्रमुख संगणक, यांना विनंती करण्यात येते की, संस्थेच्या संकेतस्थळावर कृपया प्रसिद्ध करण्यात यावी.